# जिल्हा परिषद, अहिल्यानगर
## सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग

ई-मेलः- eepwnorthnagarzp@rediffmail.com
eepwnorthzp@gmail.com फोन नं:- ०२४१ २३५५०५५


विषय- अधिसंख्य पदावर वर्ग करणे बाबत--
वाचा- 1) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. बीसीसी 2018/प्र.क्र.308 16-ब दि.21 डिसेंबर, 2019

## आदेश

खालील नमूद स्वाक्षरी दिनांक

आदेश.क्र.आस्था-2/४९३ /2025

ज्याअर्थी श्री.अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया, शाखा अभियंता यांना जिल्हा निवड समितीने शिफारसपात्र उमेदवार म्हणून स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या पदावर अनु.जमाती या प्रवर्गाकरीता राखीव असलेल्या जागेवर या कार्यालयाकडील दि. 04 /01/1997 आदेशान्वये नियुक्ती दिली आहे.

ज्याअर्थी श्री.अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया, शाखा अभियंता यांचे - मा. उपसंचालक तथा सदस्य सचिव अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी अमरावती यांचेकडील आदेश क्रमांक- ST/2013/ 12135/3799/2025 दि.२१/८/२०२५ अन्वये अवैध ठरविले आहे.

ज्याअर्थी मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल क्र.८९२८/२०१५ (चेअरमन ॲन्ड मॅनेजिंग डायरेक्टर, एफसीआय आणि इतर विरुध्द जगदिश बालाराम बहिरा व इतर) व इतर याचिका यामध्ये दि.६ जुलै, २०१७ रोजी जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना सेवेत संरक्षण देय ठरत नाही, असा निर्णय दिला आहे:

ज्याअर्थी शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/ प्र.क्र.३०८/१६-५, दि.२१ डिसेंबर, २०१९ अन्वये शासन निर्णय क्र. बीसीसी-१०९४/ प्र.क्र.६८/९४/१६-ब, दि.१५ जून, १९९५. शासन निर्णय क्र.बीसीसी-२००४/ प्र. क्र.४५/०४/१६-ब, दि.२४ जून, २००४, शासन निर्णय क्र. पीसीसी-२००२/प्र.क्र.९३/०४/१६-ब, दि.३० जून. २००४, शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१६-ब, दि.३० जुलै, २०१३, शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२०१५/प्र.क्र.२०६३/१६-ब, दि.२१ ऑक्टोबर २०१५ अधिक्रमित वरविण्यात आले आहेत.

ज्याअर्थी श्री.अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया, शाखा अभियंता यांच्या सेवा शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क.३०८/१६-ब. दि.२१ डिसेंबर, २०१९ नुसार अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती नाशिक यांचे दि. 21/8/2025 या आदेशाच्या दिनांकापासून अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात येत आहे.

त्याअर्थी श्री.अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया, शाखा अभियंता यांना तात्पुरत्या स्वरुपात ११ महिन्यांकरीता अथवा त्या सेवेत राहिले असते तर ज्या ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत अधिसंख्य पदावर कार्यरत राहतील, तसेच त्यांना पदस्थापना जि.प.सा.बां. उप विभाग राहाता येथे देणेत येत आहे.

श्री.अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया, शाखा अभियंता यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यापुर्वी त्यांना जेवढे मासिक वेतन भत्ते मिळत होते, तेवढे वेतन व भत्ते त्यांना पुढील आदेश होईपर्यंत देण्यात येईल.

सदर आदेशाची नोंद संबंधिताचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. 202512311130063 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 27.12.2025 12:17:13
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति, श्री.अनिल भगवतीप्रसाद इंदोलिया, शाखा अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग राहाता
- व्दारा व प्रत उप अभियंता. जि.प.सा.बां. उपविभाग राहाता

प्रत माहितीस्तव सादर

१. मा. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
२ मा. उप सचिव, ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन, बांधकाम भवन इमारत, २५, मर्झबान रोड, फोर्ड, मुंबई- ४०० ००१
३ मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक
४. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर
५. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर
६. निवड नस्ती कार्यकारी अभियंता जि.प.सा.वा. उत्तर विभाग, अ.नगर

Scanned with OKEN Scanner